ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता-भारतातील सार्वजनिक व्यवस्था व भ्रष्टाचाराच्या विशेष संदर्भात

**डॉ. विज ास वैजि□थ टाचले**
ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास □द्र
डॉ. बाबासाहेब आंबेड□र मराठवाडा विद्यापीठ,
औरं□बाद- ४३१००४

**प्रस्तावना**

आज जगातील सर्वाधिक तरुणांचा देश म्हणून भारताकडे पाहिले जाते. भारत म्हणजे भारत –भा म्हणजे तेज आणि रत म्हणजे रममाण झालेला असा तेजात रममाण डालेला भारत देश. मानवी इतिहासातील सर्वाधिक प्राचीन देशांपैकी एक असलेला आपला भारत देश आपली वैविध्यपूर्ण आणि वैशिष्टयपूर्ण प्राचीन संस्कृती जपत भारताने आजवर अनेकविध महान व्यक्तींच्या कार्याने,विचाराने जगावर आपली छाप पाडली असली तरी आज भारतातील लोकांकडून हाताला काम नाही,रोजगार नाही अशी नेहमी ओरड केली जाते.याचे प्रमूख कारण म्हणजे भारतातील सार्वजनिक व्यवस्थेतील बोकाळलेला भ्रष्टाचार होय. या सार्वजनिक व्यवस्थेत प्रवेश करण्याचा एकमेव मार्ग आहे तो म्हणजे शिक्षणाचा परंतू देशातील बहूसंख्य विदयार्थ्यांना खरेच चांगले, नैतिकतेचे धडे देणारे,माणूस घडविणारे शिक्षण मिळते का  हा खरा प्रश्न आहे. ऑगस्ट महिना चालू आहे, शाळा-महाविदयालयेही सुरू झाली. एकेकाळी शाळा-महाविदयालय सुरू होण्याचे दिवस हे सर्व मुला-मुलींच्या आनंदाला उधाण आणणारे आणि आपण नव्या व पुढच्या वर्गात गेल्याचा अभिमान वाटायला लावणारे दिवस असायचे. जुने सारे कांही बदलत गेले तसे या जुन्या वास्तवातही आज बराच बदल झालेला आहे. आज हे शाळा-महाविदयालय सुरू होण्याचे दिवस पुर्वीसारखे राहिले नसून ते पालकांच्या चिंतेचे,विदयार्थ्यांच्या जीवघेण्या आतुरतेचे आणि शाळा-कॉलेजच्या मालकांसाङ्गी् त्यांच्या तिजो-या भरून घेण्याचे झाले आहेत.आपल्या मुला-मुलींना चांगल्या,भौतिक सोयी-सुविधा असलेल्या शाळा-महाविदयालयात प्रवेश मिळवून दयायचा तर त्या शाळा-महाविदयालयाने,संस्थेने मागितलेली देणगी,विकासनिधीरूपी लाच ही आपल्याला परवडेल की नाही,एकीकडे या काळजीने पालक अस्वस्थ झालेले दिसतात तर हव्या त्या शाळा-महाविदयालयात प्रवेश न मिळाल्यास आपल्याला कुङ्गे शिकायला जावे लागेल याच्या काळजीत असणारे विदयार्थी दुसरीकडे पाहायला मिळतात तर याशिवाय यावर्षी आपल्या तिजोरीत किती पैसे जमा होतील याचे गणित करीत बसण्यात धन्यता मानणारे पुढारी असे चित्र आज सर्रास पाहायला मिळते.

विदयार्थी अणि पालकांच्या पिळवणूकीवरच हा काळ थांबत नाही तर याच जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यात शाळा-महाविदयालयांमध्ये कायमची नोकरीही मिळवली /दिली जाते. कोणत्याही थोडयाशा नावलौकिक असलेल्या शहा आणि महाविदयालयात शिक्षक व प्राध्यापकाची जागा अनुक्रमे २० ते २५ लाख आणि ४० ते ७० लाख रूपयांना मिळते. हे चित्र आजही कोणत्याही गावात छोटया-मोङ्गया शहरांतून वर्षानुवर्षे चालू असलेला शिक्षक, शिक्षण आणि प्राध्यापक यांच्या खरेदी विक्रीचा व्यवसाय बहूतेकांना माहित असतो.

या सर्व पार्श्वभूमीवर आपल्या पालकांची होणारी छळवणूक, पिळवणूक, भ्रष्टाचार, लाचारी हे सर्व पाहतच आजची पिढी जी सार्वजनिक व्यवस्थेत कोणत्या-ना – कोणत्या पदावर, श्रेणीवर काम करणारी आहे ती मोङ्गी होते.

या सा-या दुष्टाचक्रातून ती जात असते हे देशातील सरकार, प्रशासन, राजकीय पक्ष, नेते, राजकारणी, खासदार, आमदार या नि अशा सर्वांनाच माहित असते. परंतू सरकार गप्प, प्रशासन हतबल, न्यायमंडळाने डोळयावर पटटी बांधलेली आणि राजकारण तर याच भ्रष्टाचाराच्या मलिदयावर चालणारे असते.

गेल्या दहा-पाच वर्षात कोणत्या मंत्रयाने व अधिका-याने आपली संपत्ती किती व कोणत्या अवैध मार्गाने वाढविली याचा शोध घेणारे सरकारी खाते देशभरातील वैदयकीय अभियांत्रिकी महाविदयालयाच्या,इतर शाळा-महाविदयालयातील शिक्षकांच्या तसेच खाजगी शिकवणी वर्ग चालविणा-यांनी किती माया जमविली याची मात्र चौकशी करताना कुङ्गेही दिसत नाहीत. उदा.

दिनांक २० जून २०१६ पृष्ठ क्रमांक ०१ दैनिक सकाळमध्ये प्रकाशित भ्रष्टाचाराचे आरोप सिध्द झालेले २९ अधिकारी सेवेतच असल्याचे वृत्त,तसेच १५८ शासकीय कर्मचारी आणि अन्य लोकसेवकांविरूध्द लाच घेतल्याचे गुन्हे दाखल झाल्याचे वृत्त,

दैनिक लोकसत्ता दिनांक ०७ एप्रिल २०१६ पृष्ठ क्रमांक ०३-पन्नास हजाराची लाच घेताना दोन वरिष्ठ अधिकारी जेरबंद,-ही बातमी.

दिनांक १४ ऑक्टोबर २०१७ रोजी दैनिक सकाळमध्ये पृष्ठ क्रमांक ०८ वर प्रकाशित –दहा महिन्यात लाच-लुचपतचे शतक, महसूल-पोलीस खाते आघाडीवर,ही बातमी.

दिनांक ०४ जून २०१८ रोजी दैनिक दिव्य मराङ्गी मध्ये पृष्ठ क्रमांक१० वर प्रकाशित –सरकारी सेवांमध्ये भ्रष्टाचारात बिहार-युपीपेक्षाही पुढे गुजरात-१३ राज्यांचा अभ्यास-ही बातमी

दिनांक ०८एप्रिल २०१७ रोजी दैनिक लोकमतमध्ये पृष्ठ क्रमांक ०१ वर प्रकाशित –महिला शिक्षणाधिकारी अटकेत-०४ लाखांची लाच घेतली, ही बातमी. दिनांक १६एप्रिल २०१७ रोजी दैनिक लोकमतमध्ये पृष्ठ क्रमांक १ वर प्रकाशित-आयएएस अधिका-यासह दोघे लाच घेताना अटकेत, ही बातमी.

दिनांक ०३जुलै २०१८ रोजी दैनिक पुण्यनगरी मध्ये पृष्ठ क्रमांक ०१ वर प्रकाशित –जालन्यात पोलिस उपनिरीक्षक एसीबीच्या जाळयात-ही बातमी. दिनांक १८ जून २०१८ रोजी दैनिक पुण्यनगरीमध्ये पृष्ठ क्रमांक ४ वर प्रकाशित-मल्याची ९००० कोटीची मालमत्ता होणार जप्त, ही बातमी.

दिनांक १४ फेब्रूवारी २०१७ दैनिक दिव्यमराठी पृष्ठ क्रमांक १२ वर प्रकाशित-दोन लाख लोकांना ५०० कोटी रूपयांना फसवले-उत्तरप्रदेश ही बातमी. दिनांक १४ फेब्रूवारी २०१७ दैनिक दिव्यमराठी पृष्ठ क्रमांक १२ वर प्रकाशित-कर्ज देण्याचे आमिष दाखवून १० कोटींची फसवणूक-राजस्थान.

दिनांक २३ फेब्रूवारी २०१८ दैनिक दिव्यमराठी पृष्ठ क्रमांक ०१ वर प्रकाशित-एकाच वर्षा भारतात भ्रष्टाचार वाढला-ही बातमी. दिनांक १६ डिसेंबर २०१६ दैनिक लोकमत मधील पृष्ठ क्रमांक ०४ वर प्रकाशित-भ्रष्ट नेत्यांचा देश-संपादकीय लेख इत्यादी .

एकंदरितरित्या असे म्हणता येईल की भारतातील सार्वजनिक व्यवस्थेत आज भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर बोकाळलेला आहे. अशी स्थिती आपल्याकडे असताना आपण स्वप्न बघतो की भारत महासत्ता होईल परंतू हे स्वप्न ज्या तरूण-तरूणींच्या,विदयार्थ्यांच्या जीवावर बघितले जाते त्यांना शिकविला जाणारा अभ्यासक्रम नैतिकमूल्यांना पायदळी तुडविणारा असेल,अदययावत नसेल तर जगाला आपण कवेत तर घेवू शकणार नाहीच शिवाय आपण जागतिकीकरणाच्या जीवघेण्या स्पर्धेला तोंडही नाही देवू शकत. इतर प्रगत देशांचा विचार करता तेथील शिक्षणव्यवस्था फक्त लिखित स्वरूपाचे ज्ञान न देता जास्तीत जास्त भर प्रात्यक्षिक आणि प्रयोगावर देत असते असेच दिसते.

**समस्या सूत्रण** नैतिक मूल्यांची घसरण झाल्याशिवाय आज विकास साधता येत नाही का या प्रश्नाच्या उत्तरादाखल,महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता भारतातील सार्वजनिक व्यवस्थेतील भ्रष्टाचाराच्या विशेष संदर्भात,असा विषय सूचला.

**गृहितके**

१) विकासाच्या नावाखाली नैतिकमूल्ये पायदळी तुडवली जात आहेत.

२) नैतिकमूल्यांनी युक्त दर्जेदार पिढी सार्वजनिक व्यवस्थेतून भ्रष्टाचाराला हददपार करू शकते.

**उददीष्टे**

१) भारतीय समाजाला नैतिक, कर्तव्याभिमूख बनण्यासाठी प्रेरणा देणे.

२) महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता लक्षात आणून देणे.

**अभ्यासपध्दती**: प्रस्तूत संशोधनपर लेख लिहिण्यासाठी वर्णनात्मक आणि आशय विश्लेषणांत्मक अभ्यासपध्दतीचा वापर केला गेला आहे.

**महत्वः** महापुरूषांचे वर्णन तीन प्रकारांनी केले जाते एक म्हणजे लोकांच्या अंगी असणारी कर्मप्रवणता जागृत करून जीवनात आमूलाग्र क्रांती घडवून आणणारे लेनिनसारखे लोकोत्तर क्रांतीकारक दुसरे म्हणजे विचारशक्ती प्रखर करून तेजोमय करून तिच्या प्रकाशात समाजाला चालवणारे व्हाल्टेअर सारखे प्रतिभावंत आणि तिसरे म्हणजे भावनांचा एखादा उददाम आवेग निर्माण करून त्याच्या लाटेवर सर्वांना स्वार करून अपेक्षित दिशेने नेणारे रूसोसारखे विचारवंत. परंतू ही तिन्ही सामर्थ्ये ज्याच्या जीवनात एकत्रितपणे, बेमालूमपणे आढळतात असा एकमेव युगपुरूष म्हणजे महात्मा गांधी हे होत.

महात्मा गांधींनी आपल्या हिंद स्वराज्य या पुस्तकात अशाच प्रात्यक्षिक व प्रयोगांवर आधारित व्यवसायाभिमूख शिक्षणाचा आग्रह तर धरलाच आहे त्याशिवाय आयुष्याच्या शेवटपर्यंत सत्य, अहिंसा, सत्याग्रह यांसारख्या नैतिक मूल्यांची कास धरून ठेवली मग ते व्यक्तीगत जीवन असो की सार्वजनिक त्यांनी कधीही अजाणतेपणीदेखील नैतिक मूल्यांची हेळसांड केली नाही. म्हणूनच तर त्यांच्या एका हाकेवर देश धावून जायचा,देशाप्रती समर्पणाची भावना असलेली पिढीच्या पिढी त्यांनी जागवल्या,वाढवल्या.पण नंतरच्या काळात नैतिक मूल्ये घेवून पोसलेली पिढी लोप पावत गेली नि वर उल्लेख केल्याप्रमाणे भ्रष्टाचार,लाचारी,पिळवणूक,शोषण पाहतच मोठी झालेल्या पिढीने भारताच्या सार्वजनिक व्यवस्थेत शिरकाव केला आणि या पिढीतील बहूतेक जण भ्रष्टाचारालाच मूल्य बनवलं. खरे तर भौतिक विकासाची नैतिक मूल्यांच्या दृष्टीकोनातून चिकित्सा केली पाहिजे.उदा.भारत महासत्ता होणार हे जर ध्येय आहे तर महासत्ता होणे ही कल्पना नैतिक आहे का याचाही विचार झाला पाहिजे.महासत्ता होण्यामध्ये अर्थव्यवस्थेचा वाटा फार मोठा असतो.तेंव्हा अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र बरोबरीने चालत आहेत का किंवा त्यांनी सोबतच चालावे का हे प्रश्न ही महत्वाचे आहेत.यासंदभात आधुनिक अर्थशास्त्राचा जनक ॲडम स्मिथ हा नीतितत्वाचा मोठा भक्त राहिलेला आहे. परंतू आज ॲडम स्मिथच्या नीतिशास्त्राचा कोणीही अभ्यास करीत नाही. तो प्रयत्न सर्वप्रथम अमर्त्य सेन यांनी केला. ते म्हणतात, अर्थशास्त्राला नीतिशास्त्राची जोड असली पाहिजे. (डॉ.दिलीप खैरनार,पृष्ठ क्रमांक-१७) महासत्ता होणे,समृध्द होणे यात महासत्ता कुठल्या मार्गांचा अवलंब करुन आणि किती प्रभावीपणे होता हा नैतिक प्रश्न आहे. महात्मा गांधीनी यासंदर्भात असे विचार मांडले की,अनैतिक साधनांनी नैतिक साध्य प्राप्त करणे योग्य नाही.(डॉ.दिलीप खैरनार,पृष्ठ क्रमांक-१७) खरे पाहता २० व्या शतकातील परिस्थितीत

मोठ्ठ्या प्रमाणावर बदल होवून सगळया जगानेच २१ व्या शतकात पदार्पण केलेले आहे.२० व्या शतकातील सामाजिक,आर्थिक आणि जगभरातल्या राजकीय परिस्थितीतीही मोठ्ठ्या प्रमाणावर बदल झालेले आज दिसून येतात. जागतिकीरणाला आजच्या पिढीने जसे स्वीकारले आहे तसे कांही शाश्वत मूल्यांचाही स्वीकार होणे गरजेचे आहे.तरच जगाला विकासाच्या मार्गावरून चालत असताना विनाशाच्या खाईत ढकलणा-या भ्रष्टाचाराचा यशस्वीपणे मुकाबला करता येईल. म्हणून आज जागतिकीकरणाच्या संदर्भात आणि भ्रष्टाचाराने माखलेल्या चिखलातून गांधीविचार आणि आचारांचे प्रामाणिक आचरणच अखिल मानवजातीची यातून सुटका करू शकतात, यात माझ्या मनात शंका नाही.

**निष्कर्ष**

१. मूल्ये फार महत्वाची असतात त्यांना हजारों वर्षांचा इतिहास असतो.
२. विदयार्थ्यांना मूल्यांविषयीचे ज्ञान देण्यात धर्मसंस्था, शिक्षणसंस्था, राज्यसंस्था आणि कुटूंबसंस्था कमी पडत आहे.
३. गरजा मर्यादित करा हा महात्मा गांधींचा संदेश नीट समजून घेतला गेला नाही.
४. जागतिकीकरणातून लालसा इच्छा निर्माण झाली आणि लालसेमध्येच अध पतनाची बीजे मोठ्ठ्या प्रमाणावर असतात.
५. जे अखिल मानवजातीने स्वीकारावे असे असते ते मूल्य असते.

**शिफारशी**

१. भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करावयाचे असेल तर त्याचा शाळा-महाविदयालयांतून मुलां-मुलींवर होत असलेला आत्ताचा वाईट संस्कार ताबडतोब थांबविणे अत्यावश्यक आहे.
२. गरजांवर आधारित समाजव्यवस्थेचा स्वीकार करावा, इच्छांवर आधारलेला नाही.
३. अधिकारांवर आधारित समाज आपण निर्माण केलेलो आहोत आत्ता खरे तर कर्तव्याधारित समाजाची निर्मिती करणे खूप गरजेचे बनले आहे.

**समारोपः** एकंदरितरित्या आपणांस असे म्हणता येते की आजच्या जागतिकीकरणाच्या सावटाखाली शिक्षणव्यवस्थेतील भ्रष्टाचार सर्व प्रकारच्या भ्रष्टाचाराला जन्माला घालतो आणि हेच वास्तव असून ते सर्वाधिक अस्वस्थ करणारे आहे. आपणांस असेही म्हणता येते की हे शतक शिक्षणासाठ्ठी अतिशय पोषक असून मानवतेसाठ्ठी मात्र ते अतिशय धोकादायक आहे.अतिशय सूचक आणि –हदयस्पर्शी असा इशारा त्यातून व्यक्त होतो.भालचंद्र नेमाडे यांनी म्हटल्याप्रमाणे, संप्रेषणाच्या माध्यमातून जग जवळ येत आहे पण जवळ असलेली माणसे दूर जात आहेत.१९०७ मध्ये लिहिलेल्या हिंद स्वराज्य या आपल्या मौलिक ग्रंथात महात्मा गांधीनी अखिल मानवजातीला इशारा दिला होता की पाश्चात्य संस्कृती ही नऊ दिवसांची नवलाई आहे,ती सत्तेवर,संपत्तीवर आणि स्पर्धेवर आधारलेली आहे.या व्यवस्थेचे अंतर्गुणच असे आहेत की हिंसाचार,भ्रष्टाचार हे सगळे दोष उत्पन्न होणार आहेत.तुम्ही त्यापासून दूर राहिल्याशिवाय तुम्हाला मानवी जीवन जगणेच शक्य होणार नाही.

**संदर्भ**


*१. २० जून २०१६ पृष्ठ क्रमांक ०१ दैनिक सकाळमध्ये प्रकाशित भ्रष्टाचाराचे आरोप सिध्द झालेले २९ अधिकारी सेवेतच असल्याचे वृत्त, तसेच १५८ शासकीय कर्मचारी आणि अन्य लोकसेवकांविरूध्द लाच घेतल्याचे गुन्हे दाखल झाल्याचे वृत्त,*
*२. दैनिक लोकसत्ता दिनांक ०७ एप्रिल २०१६ पृष्ठ क्रमांक ०३-पन्नास हजाराची लाच घेताना दोन वरिष्ठ अधिकारी जेरबंद,- ही बातमी.*
*३. दिनांक १४ ऑक्टोबर २०१७ रोजी दैनिक सकाळमध्ये पृष्ठ क्रमांक ०८ वर प्रकाशित –दहा महिन्यात लाच-लुचपतचे शतक, महसूल-पोलीस खाते आघाडीवर,ही बातमी.*
*४. दिनांक ०४ जून २०१८ रोजी दैनिक दिव्य मराठ्ठी मध्ये पृष्ठ क्रमांक१० वर प्रकाशित –सरकारी सेवांमध्ये भ्रष्टाचारात बिहार-युपीपेक्षाही पुढे गुजरात-१३ राज्यांचा अभ्यास-ही बातमी*
*५. दिनांक ०८एप्रिल २०१७ रोजी दैनिक लोकमतमध्ये पृष्ठ क्रमांक ०१ वर प्रकाशित –महिला शिक्षणाधिकारी अटकेत-०४ लाखांची लाच घेतली,ही बातमी.*
*६. दिनांक १६एप्रिल २०१७ रोजी दैनिक लोकमतमध्ये पृष्ठ क्रमांक १ वर प्रकाशित-आयएएस अधिका-यासह दोघे लाच घेताना अटकेत,ही बातमी.*
*७. दिनांक ०३जुलै २०१८ रोजी दैनिक पुण्यनगरी मध्ये पृष्ठ क्रमांक ०१ वर प्रकाशित –जालन्यात पोलिस उपनिरीक्षक एसीबीच्या जाळयात-ही बातमी.*
*८. दिनांक १८ जून २०१८ रोजी दैनिक पुण्यनगरीमध्ये पृष्ठ क्रमांक ४ वर प्रकाशित-मल्याची ९००० कोटीची मालमत्ता होणार जप्त,ही बातमी.*
*९. दिनांक १४ फेब्रूवारी २०१७ दैनिक दिव्यमराठ्ठी पृष्ठ क्रमांक १२ वर प्रकाशित-दोन लाख लोकांना ५०० कोटी रूपयांना फसवले-उत्तरप्रदेश ही बातमी.*
*१०. दिनांक १४ फेब्रूवारी २०१७ दैनिक दिव्यमराठ्ठी पृष्ठ क्रमांक १२ वर प्रकाशित-कर्ज देण्याचे आमिष दाखवून १० कोटींची फसवणूक-राजस्थान.*
*११. दिनांक २३ फेब्रूवारी २०१८ दैनिक दिव्यमराठ्ठी पृष्ठ क्रमांक ०१ वर प्रकाशित-एकाच वर्षा भारतात भ्रष्टाचार वाढला-ही बातमी.*
*१२. दिनांक १६ डिसेंबर २०१६ दैनिक लोकमत मधील पृष्ठ क्रमांक ०४ वर प्रकाशित-भ्रष्ट नेत्यांचा देश-संपादकीय लेख.*
*१३. प्रा.डॉ.दिलीप खैरनार,भारतीय समाजातील नैतिक मूल्ये,डायमंड पब्लिकेशन,पुणे,ऑक्टोबर २००९.*